प्रार्थना

माझी मराठी माऊली

माझी मराठी माऊली

हिची धून गाते मन नित्य सदा सर्वकाळी

माझ्या मराठीने दिले, मला मोकळे आकाश

मराठीने त्याच्यासवे दिली उडण्याची आस

मराठीने चहूकडे, दिले हिंडण्याचे बळ

साऱ्या जगाला कवेत, घेण्याचे ही दिले बळ

माझ्या मराठी हातांत, आहे घास सर्वांसाठी

माझ्या पायांच्या शक्तीत, आहे गती विश्वासाठी

माझ्या नजरेत आहे, वेध भूत – भविष्याचा

माझ्या मराठी मनात हिमालय करुणेचा

माझी मराठी माऊली

माझी मराठी माऊली

हिची धून गाते मन नित्य सदा सर्वकाळी